# ‘मेट्रो ३’ची चाचणी आजपासून

## मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस यांची उपस्थिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** ‘कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३’च्या चाचणीस अखेर मंगळवार, ३० ऑगस्ट २०२२ पासून सुरुवात होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी सकाळी ११ वाजता एका सोहळ्यात चाचणीला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमधील (एमएमआरसी) अधिकाऱ्यांनी दिली.

‘कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३’चे काम २०२१ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र विविध कारणांमुळे या प्रकल्पास विलंब झाला. आता ‘मेट्रो ३’चा सीप्झ ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ मध्ये वाहतूक सेवेत दाखल करण्याचा निर्णय एमएमआरसीने घेतला आहे. सर्व कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आली आहेत.

कारशेडच्या कामालाही सुरुवात करण्यात आली आहे. तसेच श्रीसिटी येथून आणलेल्या पहिल्या मेट्रो गाडीची मुंबईत जोडणी करण्यात आली आहे. एमएमआरसीने मेट्रोच्या चाचणीची सर्व तयारी केली आहे.

सारीपूत नगर येथे उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या कारशेडमध्ये मंगळवारी सकाळी ११ वाजता ‘मेट्रो ३’च्या चाचणीस सुरुवात करण्यात येईल, असे एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी जाहीर केले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत चाचणीस सुरुवात करण्यात येणार आहे. सारीपूत नगर ते मरोळ अशी तीन किमीपर्यंत पहिली चाचणी होणार आहे. त्यानंतर चाचणी सुरूच राहील. एकूण १० हजार किमीपर्यंतची चाचणी यशस्वी झाल्यानंतर पुढे सुरक्षा प्रमाणपत्र घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.